## तळ्याकाठी फेरफटका

शिबिरातल्या तिसऱ्या दिवशी राजेशदादा आला होता. तो आम्हांला सगळ्यांना पहाटे लवकर तळ्याकाठी पक्षी दाखवायला घेऊन गेला. त्यानं सांगितलं, "बोलू नका, नाही तर पक्षी उडून जातील." थोड्या वेळानं आम्हांला एक खंड्या पक्षी दिसला. त्यानं जोरात सूर मारून तळ्यातला मासा पकडला. तळ्यात एक पानकोंबडी पोहतांना दिसली. बगळ्यांचा एक थवा आमच्या डोक्यावरून उडत गेला. बुलबुल झाडावरचे किडे टिपून खात होता. चार पांच-होले जमिनीवर खायला शोधत हिंडत होते. एक नाम्या पक्षी दिसला. त्याच्या कपाळावर पांढरा ठिपका होता. शिबिरात परत आल्यावर ताईनं आम्हाला पाहिलेल्या पक्षांची नावं वहीत लिहायला सांगितली.

प्रश्न-

१)शिबिरातल्या कितव्या दिवशी मुलं पक्षी पाहायला गेली?

२)पक्षी दिसावेत म्हणून राजेशदादानं मुलांना काय करायला सांगितलं?

३)खंड्या पक्षानं काय केल?

४)तळ्याकाठी दिसलेल्या चार पक्षांची नावे सांगा.

---

## काश्मीर

काश्मीर येथे डल व वूलर नावाची दोन सरोवरे आहेत. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी उन्हाळ्यात म्हणूनच लोक लांबलांबून येथे येतात. येथे बघायला येणारी प्रवासी माणसे मोठ्या मोठ्या नावा भाड्याने घेऊन त्यांत राहातात. काही नावा सामानांनी भरलेल्या असतात व असे

वाटते की दुकानेच त्या पाण्यात तरंगत आहेत. याच सरोवराच्यी काठी शालीमार व निशात नावाच्या सुंदर बागा आहेत. निसर्ग सौंदर्यामुळेच काश्मीरला पृथ्वीवरील स्वर्ग असे म्हणतात.

प्रश्न–

१) काश्मीरला जाणारी माणसे कुठे राहातात?

२) काश्मीरला कोणती सरोवरे आहेत?

३) सरोवराच्या काठी कोणत्या बागा आहेत?

४) लोक काश्मीरला का येतात?

५) काश्मीरला काय म्हणतात?

---

**<u>सहल</u>**

माया तिचे आई–बाबा आणि लहान भाऊ सनील बरोबर सुट्टीसाठी डोंगरात गेली . ते डोंगरात एका तंबूत राहिले . तिथे वीज आणि नळाचे पाणी नसते . काळोखात कंदील लावावा लागतो . डोंगरात झऱ्याचे गार पाणी वापरतात . आंघोळ ही झऱ्यावर जाऊन करतात .

माया आणि सनिलला खूप मजा आली. शहराप ासून लांब शिवाय तिथे सगळेकाही वेगळे होते . पण मायाला तिची मैत्रिण शांतीची खूप आठवण आली. मायाला बाबांचा फोन सापडला . मायाने शांतीला फोन करायचे ठरवेले . माया आणि शांती एक तास फोनवर बोलल्या . मायाने शांतीला सगळी गमंत सांगितली आणि गप्पांमधे फोनची बॅटरी संपली . नंतर

बाबाला कामाचा फोन करायचा होता पण बाबा काही फोन करू शकला नाही .

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या . (प्रत्येकी गुण ३)

१. माया डोंगरात कुठे राहिली ?
२. डोंगरात वीज आणि पाणी नसल्याने काय करतात ?
३. डोंगरात आंघोळ करायला कुठे जावे लागते ?
४. मायाने शांतीला फोन का केला ?
५. बाबा कामाचा फोन का करू शकला नाही ?

---

## **<u>श्रावण बाळ</u>**

श्रावण नावाचा एक मुलगा होता . तो खूप खूप चांगला होता . त्याचे आई–वडिलांवर खूप प्रेम होते . तो त्यांची सेवा करत असे आणि सर्व ऐकत असे . आई–वडिलांचे ही श्रावण बाळावर खूप प्रेम होते . काही वर्षांनी श्रावणाचे आई–वडिल म्हातारे झाले . त्यांना चालता येईना आणि दिसतही नसे . एकदा त्यांनी श्रावणाला सांगितले की काशी येथे यात्रेला जावेसे वाटते . श्रावणही आनंदाने तयार झाला . त्याने एक मोठी कावड आणली. एका बाजूला आईला आणि दुसऱ्या बाजूला वडिलांना बसवले . कावड खांद्यावर घेतली आणि तो काशीला जायला निघाला .

रानातून जात असताना वाटेत अंधार पडला . आई–वडिलांना तहान लागली . श्रावणाने कावड एका झाडाखाली ठेवली आणि तो पाणी आणायला गेला . दूरवर त्याला एक तळ दिसले . श्रावणाने पाण्यात भांडे बुडवले आणि ‘ बुड्रूक बुड्रूक ’ असा आवाज आला. तोच एक बाण ‘ सूं सूं ’ करत श्रावणाच्या छातीत घुसला . श्रावण ‘आईगं ’ असे जोरात ओरडून खाली पडला .

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या . गुण ३ )

१. श्रावण बाळाच्या आई–वडिलांना कुठे जायचे होते ?
२. श्रावण बाळ आणि त्याचे आई–वडिल यात्रेला कसे गेले ?
३. श्रावण बाळ रस्त्यात का थांबला ?
४. श्रा वण बाळ तळ्याजवळ का गेला ?
५. श्रावण बाळाने तळ्यात भांड बुडवल्यावर काय झाले ?

---

<u>तानाजी मालुसुरे</u>

**शिवबा :** मावळ्यांनो कोंढाणा जिंकावा अशी आमची इच्छा आहे . कोण जिंकेल हा गड?

**तानाजी :** मी जिंकतो हा कोंढाणा गड.

**शिवबा :** कोंढाणा जिंकायला फार अवघड, जीवाशीच खेळ आहे . अरे तुझ्या घरात लग्न आहे .

**तानाजी :** आधी लग्न कोंढाण्याचे आणि मग माझ्या रायबाचे .

तानाजीने स्वराज्यासाठी स्वतःच्या मुलाचे लग्न ही बाजूला ठेवले .

मध्यरात्रीच्या सुमारास तानाजी आपल्या पाचशे मावळ्याला घेवून निघाला . गडा जवळ गुडूप अंधार पडला होता . पाचशे मावळे गडा खालच्या दरीत गोळा झाले . कोंढाणा फार बळकट गड होता , त्याच्या आजूबाजूला घनदाट झाडी होती . गडाला फक्त दोन दरवाजे होते . गडावर कडक पहारा होता पण तानाजी जिथे उभा होता तिकडे खोल दरी होती . तिकडे खूप पहारेकरी नव्हते . तिच बाजू तानाजी ने निवडल ी. आपल्या बरोबर तानाजी ने एक घोरपड आणली होती . तिचे नाव यशवंती होते . हा प्राणी आपली नखे भिंतीत खुपसतो . भिंतीला चिकटून बसतो . तानाजी ने तिला दोरी बांधली आणि कड्यावर सोडली . पण दोन वेळा घोरपड खाली पडली . तानाजीला खूप राग आला. तानाजी म्हणाला , यशवंती आता पुन्हा पडलीस तर तुकडे करून भाकरी बरोबर खाईन " आणि काय गंमत घोरपड कड्याला चिकटून बसली . दोरीला पकडून तानाजी आणि त्याचे मावळे भराभर कडा चढून गेले .

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या .
(प्रत्येकी गुण ३ )

१. तानाजीने कोणता गड जिंकायचे ठरवले ?
२. तानाजीच्या घरात कोणाचे लग्न होते ?
३. गडाच्या आजूबाजूला काय होते ?
४. तानाजीने गडावर चढायला कोणती बाजू निवडली ?
५. तानाजी कोणत्या प्राण्याच्या मदताने गड चढून गेला ?

---

**ऋतू**

निकिताला वसंत ऋतू खूपच आवडतो . जेव्हा बाहेर सगळे नवे नवे वाटते . पक्षी चिव चिव करतात . सगळीकडे रंगबिरंगी फुले उमलतात .

शिव ला मित्रांबरोबर खेळायला आवडते म्हणून ग्रीष्म ऋतू आवडतो . ग्रीष्म म्हणजे उन्हाळा . उन्हाळ्यात समुद्रावर वाळूत आणि पाण्यात भरपूर खेळता येते .

अनिकाला पावसात चिंब भिजायला किव्वा छत्री घेवून शाळेत जायला आवडते . सगळी कडे हिरवे गार असते . साचलेल्या पाण्यात कागदाची होडी सोडायला मज्जा येते . तिचा आवडता ऋतू वर्षा म्हणजे पावसाळा आहे .

शरद ऋतूत झाडांची पाने रंग बदलतात . अवनी मावशी कडे बदलणारे झाडांचे रंग बघायला जाते . हिरवी पाने लाल , पिवळी , तपकिरी रंगांची होतात . रात्री सुंदर चांदणे पडते . हवा बदलून हळूहळू थंड होते . हेमंत ऋतूत गार वारा सुटतो आणि झाडांची पाने गळून पडतात . सगळीकडे पानांचा गालीचा पसरला आहे असे वाटते .

हिवाळा म्हणजे शिशिर ऋतू . अवनी आणि अमेय बर्फात खेळतात . स्नोमॅन बनवतात . ते पायात मोठे बूट घालतात आणि डोक्यावर कान झाकणारी टोपी घा लतात . तुम्ही थंडीत कसे कपडे घालता ? तुमच्या घर जवळ बर्फ पडतो का ? वसंत , ग्रीष्म , वर्षा , शरद , हेमंत आणि शिशिर असे निरनिराळे ऋतू आहेत . तुमचा सगळ्यात आवडता ऋतू कोणता ?

खालील प्रश्नांची उत्तरे वरील उतारा वाचून द्या .

(प्रत्येकी गुण ३ )

१. वसंत ऋतूत काय काय होते ?
२. शिव ला ग्रीष्म ऋतू का आवडतो ?
३. अनिकाला कोणता ऋतू आवडतो ? आणि का आवडतो ?
४. अवनी मावशीकडे का जाते ?
५. अवनी आणि अमेय बर्फात काय करतात ?